# टप्प्याटप्प्यांवर भेटलेला 'अमोलिक नाट्यधर्मी'

## अमोल पालेकर

**दृश्य १**
स्थळ : भुलाभाई इन्स्टिट्यूट, ब्रीच कॅन्डी
वेळ : दिवेलागणीची

'ययाती'ची तालीम नुकतीच संपवून, नटमंडळी– अमरीश पुरी, तरला मेहता, सुलभा देशपांडे– चहा घेत उभी आहेत. पहिल्या प्रयोगाला हजर राह्यलेल्या लेखक गिरीश कार्नाडबद्दल त्यांच्या गप्पा चालल्या आहेत; त्याच्या देखणेपणाबद्दल, त्याच्या ऑक्सफर्ड वास्तव्याबद्दल, त्याच्या लाघवी मराठीबद्दल!

धोबीतलावच्या रंगमंदिरात शुभारंभाचा प्रयोग झाल्यावर आणखी दोनतीन प्रयोग होऊन गेले आणि तेही सर्वार्थाने यशस्वी झाले. असं असूनही पुन्हा नाटकाच्या तालमीची– तीही तितक्याच शिस्तीत आणि पूर्वीच्याच जोमाने– काय बुवा गरज आहे, असा प्रश्न मनाशी घोळवत एक पोरसवदा तरुण उभा आहे.

''दुबेनं थांबायला सांगितलंय'' असं म्हणून चित्रा मुर्डेश्वर पुन्हा इन्स्टिट्यूटमध्ये जाते.

विशीतला तो तरुण जरासा अवघडून बसतो.

तरला मेहता निरोप घेऊन घाईघाईने निघते. बाकी नटमंडळीच्या गप्पा अजून चालूच.

इतक्यात कुरळ्या केसांचा, टी–शर्ट आणि हाफ पॅन्ट घातलेला सत्यदेव दुबे झपझप चालत येतो. त्याच्या हातात जाडजूड दंडुका. त्याला येताना बघून, विशीतला तरुण घाईघाईने सिगरेट विझवतो आणि उभा राहतो.

दुबे त्याच्याकडे येऊन, छोटेखानी देहयष्टीला न शोभेल अशा दमदार आवाजात म्हणतो, ''अरे अमोल, पूछना था कि मेरे अगले नाटकमें काम करोगे?''

अमोलला आश्चर्याचा धक्का बसला हे लक्षातच आलं नसावं अशा सहजगत्या उभा.

दुबे पुढे बोलतो.

''ऐसा मत समझो की तुम्हारे भीतर छिपे हुवे ॲक्टरके टॅलण्टको मैंने सुंघ लिया है और इसलिये यह रोल तुम्हें ऑफर कर रहा हूँ। पिछले कई दिनोंसे देख रहा हूँ, तुम्हारे पास काफी वक्त है– या यूँ कहो कि करने के लिये तुम्हारे पास खास कुछ नही है। इसलिये मुझे लगा कि शायद तुम थिएटरसे जुड़ जाना पसन्द करोगे।''

उत्तराची अपेक्षा न बाळगता वळून खड्या आवाजात, ''पूरीसाहब, मुझे छोड रहे हो न? तो फिर चलो।'' असं म्हटल्यावर सगळेजण लगबगीने उठतात.

पुरीच्या फटफटीच्या मागल्या सीटवर दुबे आणि साईडकारमध्ये सुलभा – असं त्रिकूट जाताना त्यांच्याकडे अमोल बघत राहतो. ते गेल्यावरही त्या दिशेला बराच वेळ बघितल्यावर, खिशातून सिगरेट काढून शिलगावतो.

हे दृश्य विरते आणि पुढचे दृश्य दिसू लागते

**दृश्य २**
स्थळ : वालचंद टेरेस, ताडदेव
वेळ : संध्याकाळची

हॉलच्या मध्यभागी एकटाच उभा अमोल.

त्याच्याभोवती काही न बोलता वाघासारखा फिरणारा दुबे.

तंग वातावरणाची धार जाणवून की काय पण चहा घेऊन आलेला पोऱ्या, पटकन किटली आणि कपांची चळत कोपऱ्यात ठेवून निघून जातो.

''दरवाजा बंद कर लो।'' दुबेचा विस्फोट.

दरवाजा तातडीने बंद होतो.

''पहलेही नाटकमें अच्छा रिव्ह्यू मिला, वो भी Times में... ज्ञानेश्वर नाडकर्णी का लिखा हुवा, तो तुम्हें लगा कि तुम ॲक्टर बन गये?''

अमोलकडून काहीच उत्तर नाही.

दुबे त्याच्याजवळ जाऊन गरजतो, ''ठीकसे खड़े नही रह सकते अभीभी।'' आणि खांद्यावर हलका फटका मारतो.

''ये कंधे tense क्यों हैं? टेन्शनकी क्या ज़रूरत है? साँस लोऽऽ साँस।''

आज्ञाधारकपणे दीर्घ श्वास घेताना अमोलला जाणवतं की खरंच! आपला आत्मविश्वास दाखवण्यासाठी आपण खांदे उंचावतो, पण खरं तर ते ताठरलेले असतात आणि त्यामुळे कदाचित आपण विनोदी दिसत असू.

चहाचा कप घेऊन दुबे वळतो आणि म्हणतो, ''और अभी जैसे सुन रहे हो मेरी बातें, स्टेजपर वैसेही क्यों नहीं सुनते दुसरों की बातें? नहीं, सुनते नहीं, सुनने की ॲक्टिंग करने लगते हो। सिर्फ सुनो– दुसरों की बात और उससे भी पहले सुनो, अपनी ख़ुदकी आवाज़।''

त्यानंतर पुढचा आठवडाभर, हॉलच्या बाजूच्या छोट्या खोलीत एकेकट्यानेच तालीम करणारा नटसंच – अमोल, नीला भागवत, मधु भट...

आद्य रंगाचार्यलिखित 'सुनो जनमेजय' नाटक हळूहळू आकार घ्यायला लागतं.

ताठरलेले खांदे हळूहळू सैलावत जातात.

स्वत:चाच आवाज ऐकायचा प्रयत्न करताना Pitch, Volume, Projection या गोष्टींचंही हळूहळू भान यायला लागतं.

अमरीश पुरी आणि कांती मडियासारख्या कसलेल्या नटांबरोबर अमोल उभा राहतो.

हेही दृश्य विरते आणि पुढचे दृश्य दिसू लागते.

**दृश्य ३**
स्थळ : दुबेचं घर
वेळ : रविवार, सकाळी १०.००

प्रिया आडारकर (दुबेची पत्नी) अगत्याने नाश्ता बनवते आहे. तितक्याच तत्परतेने थिएटर युनिटची नटमंडळी तो फस्त करत आहेत. चर्चा, वादविवाद, भांडाभांड चालूच आहेत.

मध्येच दुबे उठून उभा राहतो.

तो कमरेवर हात ठेवून उभा ठाकल्यावर क्षणार्धात शांतता पसरते.

दुबे– ''आज आमच्याकडे एक खास पाहुणा येणार आहे– भवानीप्रसाद मिश्र त्यांचं नाव. त्यांच्या काव्याचा आणि त्या व्यक्तीचा मी प्रचंड मोठा भक्त आहे.''

इतक्यात दरवाजाची बेल वाजते. स्वच्छ कुडता, धोतर अशा पेहरावातलं एक उमदं व्यक्तिमत्त्व समोर येतं.

पुरी त्यांच्या पायाशी बसून हलक्या स्वरात त्यांची विचारपूस करतो. तर त्यांच्या पाहुणचारात प्रियाला मदत करायला अब्दुल शकूर पुढे सरसावतो.

कोपऱ्यात बसलेल्या अमोलला या माणसाने लिहिलेल्या अप्रतिम कविता आठवतात– विशेषत: दुबेच्या तोंडून अनेकदा ऐकूनही प्रत्येक वेळी नवे पदर उलगडणारी 'गीत फरोश'–

जी हाँ हुजूर, मैं गीत बेचता हूँ।
मैं तरह तरह के गीत बेचता हूँ,
किस्म किस्म के गीत बेचता हूँ।

थिएटर युनिटमध्ये पहिल्या प्रयोगानंतर होणाऱ्या पार्ट्यांमध्ये गांजलेल्या, दीन, बापुडवाण्या कवीची ही व्यथा, दुबे अत्यंत प्रभावीपणे सादर करायचा. दुबेचं ते काव्यकथन तरुण, उत्साही अमोलने आकंठ अनुभवलं होतं.

अजिबात आढेवेढे न घेता अमोलच्या विनंतीला मान देऊन भवानीजी ती कविता पेश करायला तयार होतात. एका थोर कवीची कविता त्याच्या स्वत:च्या तोंडून ऐकायचा आगळा आनंद घेण्यासाठी सगळेजण दाटीवाटीने कोंडाळं करतात.

भवानीजी खणखणीत आवाजात ठणकावून म्हणतात, ''जी हाँ हुजूर, मैं गीत बेचता हूँ।'' स्वरात अजीजीचा लवलेशही नाही. उलट ''तू कोण रे मला विचारणारा?'' अशा आविर्भावात पूर्ण कविता सादर करतात.

स्वत:च्या कलेबद्दलचा सार्थ अभिमान आणि आत्मविश्वास त्यांच्या स्वरास्वरांतून पाझरत जातो.

भर दुपारी घरी परतताना अमोलला (बोधिवृक्षाखाली बसल्याप्रमाणे) जाणवतं की एकाच शब्दाचे अनेक अर्थ, ते व्यक्त करायचे निरनिराळे दृष्टिकोन आणि गाभा कायम ठेवून तिथे पोचायच्या विविध वाटा– या सगळ्या धडपडीलाच तर interpretation म्हणतात.

आणि मग बादल सरकारलिखित 'एवम् इंद्रजित'चं कलकत्त्याच्या शामानंद जालानचं (लेखकाला मध्यबिंदू धरून केलेलं) interpretation आणि दुबेचं (इंद्रजित हा केंद्रबिंदू धरून केलेलं) interpretation या दोन्हींमधलं सामर्थ्य पुन्हा एकदा लक्षात येतं; अमोलला भरून येतं.

–हेही दृश्य विरून जातं आणि पुढचं दृश्य दिसायला लागतं.

**दृश्य ४**
स्थळ : नाटकवेड्यांचे वेगवेगळे अड्डे
वेळ : संध्याकाळ

अच्युत वझेच्या नव्या नाटकाची निर्मिती दुबेने केली आहे. नाटकाचं मूळ नाव 'सोफा–कम–बेड.' ते बदलून दुबेने केलेलं नामकरण 'धाडशी धोंडूच्या धांदली.' शिवाय दुबेने, नाटकातली मध्यवर्ती भूमिका एका नटाने करण्याऐवजी तिघांनी करायची असं ठरवलं आहे– विहंग नायक, दिलीप कुलकर्णी, संजय पेठे हे तिघे! 'धाधोंधां'चा एखाद दुसरा प्रयोग छबिलदासमध्ये होतो न होतो तेवढ्यात अच्युतने स्वत:च 'सो–क–बे'ची नाट्यनिर्मिती करायची ठरवून लगेच तालमीही सुरू केल्यामुळे प्रायोगिक नाट्यजगतात एकच खळबळ माजली आहे.

दिग्दर्शकाने नाट्यसंहितेमध्ये केलेले बदल जाचक/असह्य/अमान्य वाटल्यामुळे लेखकाने स्वत:च्या संहितेला न्याय देण्यासाठी अशी कृती केली तर त्यात अनुचित काय?

एकाच वेळी एकाच संहितेची दोन समांतर रूपं आली तर प्रायोगिक रंगभूमीचा मूठभर सहृदय प्रेक्षकवर्ग विभागला जाणं कितपत उचित आहे?

अशा (आणि याच धर्तीवर अनेक) प्रश्नांवर, 'कॉफी हाऊस' पासून ते प्रत्येक प्रायोगिक नाट्यसंस्थेच्या अड्ड्यांवर गरमागरम चर्चा सुरू आहे.

अच्युत वझेच्या समांतर निर्मितीच्या बाजूने श्रीराम लागू, पुष्पा आणि अनंत भावेसारखे मान्यवर उभे ठाकल्यामुळे, 'धाधोंधां'च्या प्रयोगांचं पुढे काय होणार असा व्यावहारिक प्रश्नही उपस्थित झाला आहे.

पुष्पाबाईंच्या घरी झालेल्या बैठकीत, या गुंत्यावर कोणताच तोडगा निघू न शकल्यामुळे निराश झालेला अमोल तातडीने आपल्या स्कूटरवरून वालचंद टेरेसला जातो.

सगळा वृत्तांत ऐकून घेतल्यावर दुबे (त्याला न शोभेशा शांतपणे) उठतो आणि येऊन हॉलच्या दारात उभा राहतो. काही वेळाने म्हणतो, ''लेखकाचं अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि त्याचे समांतर धुमाळे याबद्दल असोशीने बोलणारे हे सगळे... एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट नजरेआड करतायत. 'धाधोंधां'ला सेन्सॉर बोर्डाने परवानगी नाकारल्याय. बोर्डाने सुचवलेली काटछाट अमान्य करून मी त्यांच्याशी भांडतोय आणि प्रयोग करतोय. अच्युतने लिहिलेला शब्दनशब्द कलात्मकदृष्ट्या कसा आवश्यक आणि अपरिहार्य आहे, हेच मी बोर्डाला पटवून देतोय. पण अच्युतने मात्र स्वत:च बोर्डाने सुचवलेली काटछाट मान्य करून सेन्सॉर सर्टिफिकेट मिळवलंय. म्हणजे माझ्या झगड्यातली हवाच निघून गेली.'' अमोलच्या नजरेला नजर देऊन तो म्हणतो, ''तुमच्या मराठीत म्हणतात ना, म्हातारी मेल्याचं दु:ख नाही रे.... लेखकाच्या अभिव्यक्ती

स्वातंत्र्याविरुद्धच्या शक्ती सोकावणार आहेत!''

'गिधाडे'च्या निमित्ताने सेन्सॉर बोर्डाशी दुबेने निधडेपणाने दिलेला लढा अमोलने अगदी जवळून बघितला आहे. त्यामुळे सेन्सॉर बोर्डाच्या रचनेपासून ते नियमावलीपर्यंत सरकारला करावे लागलेले बदलही पाह्यले आहेत.

त्याच दुबेला असा विकल झालेला बघून अमोल गलबलतो. दोघेही कितीतरी वेळ तसेच नुसते बसून राहतात.

आजूबाजूला वाढत जाणारा अंधार.

हे दृश्य विरते आणि पुढचे दृश्य उमटते.

**दृश्य ५**
स्थळ : विमलाबाई गरवारे शाळा
वेळ : संध्याकाळी ६.००

राजाभाऊ नातूंनी दुबेला पुण्यात आणलं आहे; तो अख्खा महिना पुण्यात तळ ठोकणार आहे.

नाटकवेड्या तरुण पोरांनी, फक्त पुरुषोत्तम करंडकातच घुटमळत न राहता त्यांच्या कक्षा रुंद व्हाव्यात, त्यांनी नाट्यधारेत यावं, या हेतूने राजाभाऊंनी प्रदीर्घ नाट्यशिबिर आयोजित केलं आहे.

कलोपासक सोडून बाकीच्या नाट्यसंस्थांचा प्रतिसाद, पुणेरी स्वभावाला अनुसरून, फारसा उत्साहवर्धक नाही.

शिवाय खोचक, बोचक प्रतिक्रिया तर उदंड आहेत.

एका संध्याकाळी, शिबिरांतल्या मुलामुलींशी मोकळ्या गप्पा मारायला राजाभाऊंनी अमोलला आग्रहाने आणलं आहे. गजानन पराजंपे, मधुरा देव, सोनाली कुलकर्णी, अमृता सुभाष सारख्या षोडषवर्षीय उत्साही, सळसळत्या मंडळींबरोबर गप्पा ठोकताना, वेळ कसा गेला हेच कळत नाही.

कुसुमाग्रजांच्या कविता घेऊन 'आयुष्यात पहिल्यांदाच' हा नाट्याविष्कार उभा होणार आहे, या कल्पनेने सगळेच हरखून गेले आहेत.

उशिरा घरी परतताना, अमोलला वाटतं, इतकी तपं उलटून गेली तरी दुबे बदललाच नाही. वयोमानापरत्वे शरीर थकलेलं जाणवतंय. त्याचा शीघ्रकोपी स्वभाव – अगदी खुर्ची फेकून मारण्यापर्यंत– आता खूपच मवाळ झाला असला तरी आतली धगधगणारी आच तेवढीच तीव्र आहे.

गाडीच्या खिडकीतून झपाट्याने मागे जाणाऱ्या दृश्यांबरोबर अमोलला दिसतो वेगवेगळ्या अवस्थांमधला दुबे–

१९६७ साली पहिल्यांदा ओळख झाल्यानंतर पुलाखालून खूपच पाणी वाहून गेलं.

अगदी गेल्या वर्षी, २००७ साली पुन्हा एकदा पुण्यात कार्यशाळा घ्यायला आलेला दुबे अमोलला म्हणतो, ''अरे बाबा, तुझ्या मुलीला– समीहा नं नाव तिचं? पाठव तिला माझ्याकडे... नीट उभं राह्यला तरी शिकवेन, बाकी काही नाही तर!''

आणि त्यापूर्वी १९९२ मध्ये, अमोलने मोठ्या लेकीला – शाल्मलीला त्याच्या हाताखाली धडें गिरवायला नेलं होतं, तेही आठवतं. मिट्ट काळोखानं झरझर मागे पडणाऱ्या रस्त्याकडे बघताना अमोलला असंही पुन्हा एकदा जाणवतं की हातचं न राखता भरभरून देण्याची दुबेची आत्मीयता जशी आपल्याला चिंब करून गेली, तशीच या पोरांनाही, आजही चिंब करते आहे. काळोखातला रस्ता एकदम लख्ख झाल्यासारखा वाटतो– दुबेच्या सहवासामुळे उजळून गेलेल्या कित्येक आयुष्यांसारखाच लख्ख!

हे दृश्य विरून पुढचे दृश्य दिसते.

**दृश्य ६**
दिनांक : ७ नोव्हेंबर २००८
स्थळ : पृथ्वी थिएटर
वेळ : रात्री ८

संजना कपूरचा फोन आला, 'पोचतोयस ना रात्रीच्या दुबे night ला?' त्या रात्री मुंबईला जाताना, काही महिन्यांपूर्वी दुबेशी गोव्यात झालेली भेट अमोलला आठवली. तिथला समारंभ संपल्यावर दुबेला त्याच्या खोलीत सोडून अमोल परत फिरला तेव्हा दुबेने त्याला थांबवलं; म्हणाला, ''अरे अमोल, हल्लीच तुझा 'आक्रीत' पुन्हा बघायला मिळाला. चांगलं काम केलंयस रे तू... चुकून!'' अमोलने त्याच्याकडे चमकून पाह्यलं त्यावर तो फक्त गोड हसला. ४० वर्षांनंतर दुबेकडून मिळालेली ही पावती गच्च धरून अमोल पृथ्वीच्या आवारात पोचला.

हेमू अधिकारी, दिलीप कोल्हटकर, शांता गोखले, अगदी कलकत्त्याहून आवर्जून आलेल्या प्रतिभा अग्रवाल, फारशा बाहेर न पडणाऱ्या पुष्पा भारती, जर्सन डाकुन्हा, डॉली ठाकोरपासून ते आजचे सुनील शानभाग, किशोर कदम, रत्ना पाठक शाह– मराठी, गुजराथी, हिंदी, इंग्रजी रंगभूमीवरचे झाडून सगळे छोटेमोठे, बच्चे, तरुण, म्हातारे नाटकवेडे, दुबेला कुर्निसात करायला आले होते.

अलीकडच्या आजारातून नुकत्याच सावरलेल्या दुबेने वळून अमोलकडे बघितलं; गोड हसून म्हणाला, ''संध्या पण आल्याय नं?''

अमोल काही बोलणार इतक्यात कुठल्या तरी चॅनलच्या सुंदरीने दुबेसमोर मायक्रोफोन धरला.

हळूहळू मागे सरकणाऱ्या अमोलला थकला भागला दुबे दिसत राह्यला.

आणि आसमंतातला सगळा कोलाहल बंद झाला.

त्या अफाट गर्दीत तो कुरळ्या केसांचा, छोट्या शरीरयष्टीचा दुबे हरवून जाण्याऐवजी, सगळी गर्दीच दुबेमय होत गेली! ■